MHRG190004972023

:: विशेष दरखास्त क्र.२९/२०२३ मधील निशाणी क्र.१९ खालील आदेश ::

प्रस्तुत दरखास्तमधील दरखास्त/अर्जदार क्र.५ यांच्या वारसांनी त्यांना प्रस्तुत दरखास्तमध्ये वारस म्हणुन समाविष्ट करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १, नियम १० प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. अर्ज व अर्जाला दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. प्रस्तुत अर्जातील अर्जदारांचे कथन की, प्रस्तुत दरखास्तीमधील दरखास्त/अर्जदार क्र.५ श्रीमती मंदाबाई भिकु सुतार या दिनांक १३.०७.२०.२१ रोजी मयत झाल्या असुन त्यांना संतोष भिकू सुतार, अनिता चंद्रकांत सुतार, संदिप भिकू सुतार आणि शर्मिला भिकू सुतार हे कायदेशीर वारस असुन त्यांना आवश्यक पक्षकार करणे आवश्यक आहे. अर्जदार यांचे पुर्वज श्रीमती मंदा भिकू सुतार हिचे अखत्यारपत्र दस्त नोटरी अ.क्र.१७६५/२०१९, दि.१९.०७.२०१९ रोजी श्री.एकनाथ काशिनाथ उर्फ काशीराम सुतार यांनी अखत्यारपत्र घेतले होते परंतु श्रीमती मंदाबाई भिकू सुतार या मयत असल्यामुळे अर्जदार यांना सदर दरखास्तीमध्ये मयत मंदाबाई सुतार यांचे कायदेशीर वारस म्हणुन आवश्यक पार्टी म्हणुन सामील करणे आवश्यक असल्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०४. अर्जदार व अर्जातील इतर वारस यांना सदर दरखास्तीमध्ये दरखास्त अर्जदार म्हणुन समाविष्ट करुन घेऊन मगच दरखास्त अर्जाची चौकशी घेणे हे न्यायीक व कायदेशीर आहे त्यामुळे सदरचा अर्ज मंजुरीस पात्र आहे. अर्जदार व त्यांचे वारसांना अर्जामध्ये सामील न केल्यास अर्जदारांचे पैशाच्या स्वरुपात कधीही न भरुन येणारे नुकसान होईल तरी अर्जदार व इतर वारसदार यांना सदर दरखास्तीमध्ये आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करण्याची विनंती केली आहे.

०५. सदर अर्जास विरोध करताना सामनेवाला यांनी वारसांची संख्या व वर्णन योग्य असल्यास तसेच इतर दरखास्तदार यांची कोणतीही हरकत नसल्यास सदरचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी योग्य ते न्यायाचे आदेश होणेस विनंती केली आहे.

०६. अर्जदार व सामनेवालातर्फे करण्यात आलेल्या कथनांचे विवेचन करण्यात आले. अर्जदार यांनी अर्जामध्ये नमुद केलेले दरखास्त अर्जदार यांचे नातेसंबंध ही निर्विवादीत बाब असल्याचे स्पष्ट होते. प्रस्तुत दरखास्तमधील मुळ अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१, नियम ३० प्रमाणे एल.ए.आर.क्र.९९/२००५ मध्ये न्यायालयाने दिलेला निकाल व हुकूमनाम्याप्रमाणे अंमलबजावणी होणेकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जदारांचे नातेसंबंध, दरखास्तचे स्वरुप व अर्जदारांनी केलेली कथने लक्षात घेता, प्रस्तुत अर्जदारांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. अर्जदारांना प्रस्तुत प्रकरणात समाविष्ट करुन त्यांची बाजु मांडण्यास संधी दिल्यास सामनेवाला यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट मिळकतीसंदर्भात असलेले हितसंबंधित सर्व व्यक्तीचे म्हणजेच अर्जदारांचे म्हणणे ऐकुन सदरचे प्रकरण गुणदोषावर निकाली निघेल. सदर

चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## :: आदेश ::

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांना दरखास्त/अर्जदार क्र.५. श्रीमती मंदाबाई भिकू सुतार यांचे कायदेशीर वारस म्हणुन १.संतोष भिकू सुतार, २.अनिता चंद्रकांत सुतार, ३. संदिप भिकु सुतार आणि ४. शर्मिला भिकू सुतार यांना समाविष्ट करावे असे आदेशित करण्यात येते.

३. अर्जदारने विहीत मुदतीत दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करण्याबाबत आदेशित करण्यात येते.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.09.18 17:48:02 +0530

महाड
दिनांकः१८.०९.२०२५

(श्रीमती एच.आर.जाधव)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
महाड.